महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती

प्लॉट पी -१०७ एम.आय.डी.सी.आवार, महिला रुग्णालयासमोर, बारामती पिन नं. ४१३१३३

Email – admgmcbaramati@gmail.com PH : 02112-244172

जा.क्र.पुअहोशावैमबा/राजप/वै.अ./1397/२०२६ दिनांक : 20/8 /२०२६

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती या संस्थेत वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वार स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशी नुसार १२० दिवसांकरिता पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे जाहिरात तयार करण्यात आलेली आहे.

## जाहिरात

**विषय :-** वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारशीनुसार १२० दिवसांकरिता भरण्याबाबत..

संदर्भ :- १) शासन पत्र क्र. एलईसी-१४१०/प्र.क्र.९५/वैसेवा-३दि.०१/०७/२०१०

२) मा.संचालनालयाचे पत्र क्र.संवैशिवस-अधिक्षक-उपअधिक्षक वै.अ.व इतर वैद्यअ./१फ/१० दि. ०१/०७/२०१०

३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,शासन निर्णय क्रमांक ई-१०६७७४४/२०२५/VAISEVA-३, दि.२३/०५/२०२५

४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक:एमईडी-२९१९/प्र.क्र.२६२/वैसेवा-३ दि.३१/१२/२०२०

५) दि. २०/०८/२०२६ रोजीची मान्य टिपणी

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या त्रूटीच्या पुर्ततेसाठी तसेच दैनंदिन रुग्णसेवा अबाधित राहण्याच्या दृष्टीने अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती या संस्थेच्या अस्थापनेवरील रिक्त असलेली वैद्यकीय अधिकारी यांची पदे मा. संचालनालय, मुबई यांच्या मार्फत बंधपत्रीत उमेदवार उपलब्ध किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवाराची नियुक्ती होईपर्यंत किंवा बदलीने उमेदवार उपलब्ध होइपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, स्थानिक निवड मंडळ समितीचा शिफारशीनुसार १२० दिवसांच्या कालावधीकरिता कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीत गुणवत्तेनुसार भरण्याकरिता पात्र उमेदवारंकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागवण्यात येत आहेत. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविण्यात येणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.

अर्ज सादर करावयाचा कालावधी दि. २७/०८/२०२६ ते दि. ०४/०९/२०२६ रोजी सायंकाळी ५.४५ वाजे पर्यंत.

मुलाखतीचा दिनांक :- दि. ०८/०९/२०२६ रोजी दुपारी ३ वाजता (मुलाखतीस मुळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.)

मुलाखतीचे ठिकाण - मा. अधिष्ठाता दालन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती

त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी (शासकीय सुट्टी वगळुन) या कार्यालयातून जाहिरातीच्या दिनांकापासुन विहीत कालावधीत अर्ज शुल्क रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त ) रोखपाल शाखेत भरुन अर्ज प्राप्त करुन घ्यावेत. अर्जात नमुद कागदपत्रे प्रमाणपत्रांसह सांक्षांकीत केलेल्या प्रती अर्जासबत जोडणे अत्यंत आवश्यक आहे. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह सांक्षाकीत केलल्या प्रतींचा एक संच सोबत घेउन येणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

वैद्यकीय अधिकारी रिक्त पदांच्या उपलब्धतेप्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येतील व तद्नंतर रिक्त पद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

उमेदवाराची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरिल पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात १२० दिवसांसाठी असून, कोणतीही पूर्व सुचना न देता तात्पुरती कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल.

अटी व शर्ती

शैक्षणिक पात्रता

| | | |
|---|---|---|
| पद | - | वैद्यकीय अधिकरी |
| शैक्षणिक अर्हता | - | एम.बी.बी.एस (अनुभव असल्यास प्राध्यान्यक्रम) |
| वयोमर्यादा | - | ३८ वर्षे, मागसवर्गीय ४५ वर्षे |
| वेतनश्रेणी | - | एकत्रित मानधन :- ८०,०००/-<br>विशेषज्ञ अर्हताधारक ९०,०००/- |
| रिक्त पदे | - | वैद्यकीय अधिकारी -८ पदे |

१) वैद्यकीय अधिकारी पदाची वेतन श्रेणी- सदरील उमेदवारांना दि. ३१/१२/२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार (एम.बी.बी.एस. अर्हताधारक -८०,०००/- व विशेषज्ञ अर्हताधारक -९०,०००/-) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहील. सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मुळ अनुदानातुन १०- कंत्राटी सेवा या उद्दिष्टामधून भागविण्यात येईल.

२) उमेदवाराच्या निवडीबाबत प्राधान्य क्रम:-

उच्चअर्हता व अनुभवधारक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

३) वयोमर्यादा किमान व कमाल वयोमर्यादा

| वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | किमान वय | कमाल वय | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण / महिला | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | दिव्यांग उमेदवार |
| | | अराखीव (खुला) | मागासवर्गीय / आर्थिकदृष्टया दुर्बल घटक / अनाथ | अराखीव (खुला) | मागासवर्गीय / आर्थिकदृष्टया दुर्बल घटक / अनाथ | |
| ०१/०९/२०२६ | १८ | ४० | ४५ | ४३ | ४५ | ४५ |

४) गुणवत्ता यादी ही पदवी परीक्षेच्या एम.बी.बी.एस. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष परीक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल.
५) जाहिरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना राखून ठेवलेले आहेत.
६) उमेदवार या महाविद्यालया व्यतिरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्था प्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
७) ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असताना सतत जास्त कालावधीपर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

टिप :-

१) ज्या उमेदवारांना संचालनालयाकडून मध्यवर्ती निवड प्रक्रियेद्वारे या पुर्वी विषेशज्ञ वैद्यकीय अधिकारी व वैद्यकीय अधिकारी या पदाकरिता शिफारस / निवड करण्यात आली आहे. असे उमेदवार या मुलाखतीस पात्र राहणार नाहीत.

२) निवड प्राप्त उमेदवारांना कोव्हिड- १९ तथा आपत्कालीन परिस्थीतच्या अनुषंगाने सेवा करणे बंधनकारक राहील.

८) आवश्यक प्रमाणपत्रे - अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या सांक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१) एम.बी.बी.एस. ची सर्व गुणपत्रे प्रयत्न प्रमाणपत्र अंतरवासिता प्रमाणपत्र पासिंग व डिग्री प्रमाणपत्र

२) एम.बी.बी.एस.व नोंदणी प्रमाणपत्र तसेच आवश्यक असल्यास नोंदणीचे नुतनीकरण

३) बंधपत्र प्रमाणपत्र

४) अनुभव प्रमाणपत्र

५) जन्म तारखेचे प्रमाणपत्र

६) नावात बदल असल्यास गॅझेटची प्रत

७) आधार कार्ड व पॅन कार्ड ची प्रत

८)सदर पदांकरिता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ १२० दिवसांसाठी व अत्यंत तात्पुरत्या कंत्राटी स्वरुपात राहील. १२० दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रीक खंड देऊन पुन्हा १२० दिवसांसाठी नियुक्ती करिता विचार करण्यात येईल.

९) निवड झालेल्या उमेदवारास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती संस्थेतील कोणत्याही संलग्न रुग्णालयात नेमणूक केली जाईल व तेथे काम करावे लागेल प्रशासनास आवश्यक्ता असल्यास यापैकी कोणत्याही रुग्णालयात बदल होऊ शकेल अर्जा सोबत प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती सांक्षांकीत करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१०) सदर पदावर कार्यरत असताना आपणांस खाजगी व्यवसाय करता येणार नाही.

११) सदर नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणांस या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाहीत व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील या बाबत कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

१२) पदाचा राजीनामा देण्याकरिता १ महिन्याची पुर्व सुचना देणे आवश्यक राहील अन्यथा नोटीस न देता पदाचा राजीनामा दिल्यास शेवटच्या १ महिन्याचे देय वेतन शासन खाती जमा करण्यात येइल.

१३) भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कोणत्याही टप्प्यावर पदस्थितीमध्ये बदल होऊ शकतो.

१४) अर्ज भरण्याच्या प्रक्रियेची माहिती.

(डॉ. अंजली पाटील)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
बारामती.

प्रती:-१) अधिष्ठाता यांचे स्विय सहाय्यक, शा.वै.म. व रु.,बारामती
२) डॉ. राजेश उमप, वैद्यकीय अधिक्षक,शा.वै.म.व रु., बारामती
३) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य
४) सुचना फलक , शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती

प्रत माहिस्तव सविनय सादर
१) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
२) मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner

प्रत

१) रोखपाल शाखा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, बारामती यांना आदेशित करण्यात येते की, इच्छुक असलेल्या उमेदवारांकडून (शासकीय सुट्टी वगळून) या कार्यालयातून जाहिरातीच्या दिनांकापासून विहित लावधीत अर्जाचे शुल्क रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.

२) श्री. राहुल रोकडे, निम्नश्रेणी लघुलेखक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती यांना आदेशित करण्यात येते की, सदर जाहिरात दि. २०/०८/२०२६ रोजी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

Scanned with OKEN Scanner